# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय - शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थांमधील विविध अभ्यासक्रमांचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरणासाठीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यक्रम व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| शैक्षणिक वर्षे २०१५-१६ साठी संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांनी निरंतर संलग्नीकरण नसलेल्या अभ्यासक्रमांचे नुतनीकरण /नैसर्गिक विस्तार मान्यता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी, संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांनी नुतनीकरण व नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात व प्रत्येक अभ्यासक्रमासाठी विहीत शुल्कासह तीन प्रतीमध्ये (एक मुळ प्रत व दोन छायांकीत प्रती) विद्यापीठास कार्यालयीन वेळेपूर्वी सादर करण्याची मुदत - | दि.३१ ऑगस्ट,२०१४ पर्यंत |
| ज्या संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांना निरंतर संलग्नीकरणासाठी प्रस्ताव सादर करावयाचे आहेत त्यांनी त्यांचे प्रस्ताव विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात विहीत शुल्कासह तीन प्रतीत (एक मुळ प्रत व दोन छायांकीत प्रती) सादर करण्याची मुदत - | दि.३१ ऑगस्ट,२०१४ पर्यंत |

**सुचना :**

- महाविद्यालयातील नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचे सर्व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव एकाचवेळी सादर करावेत.
- प्रस्ताव सादर करताना प्रस्ताव तपशिलाचा सोबतचा नमुना त्यामध्ये कोणताही बदल न करता महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सही शिक्क्यानिशी सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी Plane Paper वापरावा. (महाविद्यालयाचे Letter Head वापरू नये.)
- दि.०१ सप्टेंबर,२०१४ पासून ०.१३०(i) नुसार प्रती अभ्यासक्रम विलंब शुल्क आकारले जाईल.
- ज्या महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमास विद्यापीठ अधिकार मंडळाने अटींची पडताळणी करण्यासाठी समिती पाठविण्याची शिफारस केली आहे त्या महाविद्यालयांनी त्रुटीपुर्तता अहवाल विद्यापीठास सादर केल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चा नुतनीकरण प्रस्ताव विद्यापीठात स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
- जी महाविद्यालये निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव सादर करणार आहेत त्यांनी पुर्वीच्या नुतनीकरण पत्रासह चालू नुतनीकरण प्रस्ताव व निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव एकाच वेळेस सादर करावेत.
- महाविद्यालयांनी वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरले नसल्यास नुतनीकरण /नैसर्गिक विस्तार /निरंतर प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.
- प्रस्ताव व शुल्क एकाचवेळी जमा करून घेतले जाईल.
- प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतीच्या अंतिम दिवशी विद्यापीठात गर्दी टाळण्यासाठी महाविद्यालयांनी अंतिम दिवसापूर्वी प्रस्ताव विद्यापीठात सादर करून विद्यापीठास सहकार्य करावे.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ क्र.: संलग्नता टी-२/ 88
दि. 01 AUG 2014

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार/निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव सादर करताना भरावयाच्या तपशिलाचा नमुना**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संस्थेचे नाव | | | | |
| महाविद्यालयाचे नाव | | | | |
| महाविद्यालयाचे संकेतस्थळ | | | | |
| प्राचार्यांचा ई-मेल व मोबाईल नंबर | | | | |
| विद्यापीठ संगणकीय नोंद क्रमांक | | | | |
| प्रस्तावाचा महाविद्यालय पत्र संदर्भ क्र. व दिनांक | | | | |
| अ.क्र. | प्रस्ताव प्रकार | अभ्यासक्रम | भाग | शुल्काचा तपशिल |
| १ | नुतनीकरण | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| २ | नैसर्गिक विस्तार | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| ३ | निरंतर संलग्नीकरण | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावाची आवश्यक ती सर्व कागदपत्रे व मागील संलग्नीकरणाच्या विद्यापीठ मान्यतेची प्रत सोबत सादर केली आहे.

दिनांक महाविद्यालयाचा शिक्का प्राचार्य

---

**विद्यापीठ कार्यालयीन उपयोगासाठी**

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावाची सर्व कागदपत्रे तपासली. एकूण शुल्क रू. ------------- इतके लेखा विभागाने A.2.R.1 या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली जमा करून त्याची पावती दयावी.

कनिष्ठ/वरीष्ठ सहाय्यक/सहा.अधीक्षक अधीक्षक

सहा.कुलसचिव उपकुलसचिव